**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. आनंद सायबू क्षीरसागर
भारती विद्यापीठासमोर, सुशिलनगर, घ.नं.६७,
विजापूर रोड, सोलापूर .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ३१.३.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. आनंद सायबू क्षीरसागर<br>भारती विद्यापीठासमोर, सुशिलनगर, घ.नं.६७,<br>विजापूर रोड, सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.११.२००९ |
| ६ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

आपण केलेल्या अपिलात राज्य माहिती आयोगाने केलेल्या दंडाची वसुली व संबंधितांच्या सेवापुस्तकातील नोंद याची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.आनंद सायबू क्षीरसागर यांनी केली.

शास्तीची रक्कम वसूल करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची पूर्ण माहिती श्री. क्षीरसागर यांना दिली आहे. अपीलकर्त्याची मुद्दा क्र.४ मधील निकषांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला सेटलमेंट, सोलापूर या शाळेतील शिक्षकांच्या नियुक्तीच्या संदर्भात श्री. क्षीरसागर यांची तक्रार असून त्याबाबत दोन वेळा चौकशी झाली आहे व त्याची माहिती अपीलकर्त्यास दिली आहे. एकाच शाळेच्या संदर्भात वादापोटी श्री. क्षीरसागर अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत असतात. त्यांनी माहितीच्या अधिकारात याच शाळेबाबत ४० ते ५० अर्ज केले आहेत. संबंधित संस्थेच्या मुख्याध्यापकांवर कारवाई चालू आहे. श्री. क्षीरसागर यांनी त्याच त्याच विषयासाठी माहितीच्या अधिकाराचा वापर करून सर्व यंत्रणाना अकारण वेठीस धरण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा आवश्यक तर योग्य त्या न्यायालयात दाद मागावी, अशी विनंती त्यांना वेळोवेळी केली आहे. तरीही अशा प्रकारचे अर्ज व अपिले यामुळे एकाच व्यक्तीसाठी कार्यालयीन यंत्रणेवर मोठा ताण पडतो, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.एन. वीर यांनी केले.

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या निवेदनातील बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊन अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर योग्य प्रकारे करावा, अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. संबंधितांच्या सेवापुस्तकात नोंद घेतल्याची छायांकित प्रत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सादर केली, ती अपीलकर्त्यास देण्याचे आदेश आयोगाने दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संभाजी नामदेव भेगडे
२८१/४, शनिवार पेठ,
तळेगांव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे ४१० ५०६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्याधिकारी,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कनिष्ठ रचना सहाय्यक,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ००६८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०७.०४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** -श्री. संभाजी नामदेव भेगडे
२८१/४, शनिवार पेठ,
तळेगांव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे ४१० ५०६

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्याधिकारी,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, पुणे श्री.एस.के.देसाई

**जन माहिती अधिकारी तथा** कनिष्ठ रचना सहाय्यक,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, पुणे श्री.राहुल रामदास दिवेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.११.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०३.१०.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

झोन दाखले व भाग नकाशा देण्यासाठी अवाजवी शुल्क जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ रचना सहाय्यक, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, पुणे श्री.राहुल रामदास दिवेकर यांनी कळविले.

नगरपरिषदेने केलेल्या ठरावानुसार शुल्क अकारणी केल्याचे त्यांनी सांगितले आहे. कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसाठी प्रति पृष्ठ रु.२/- ऐवजी रु.१०/- प्रमाणे शुल्क कळविले, ते ही अवाजवी आहे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील अंतर्गत रु.२/- प्रती पृष्ठ शुल्कानुसार सर्व माहिती मिळाली पाहिजे. अशी तक्रार अपीलकर्ता श्री. संभाजी नामदेव भेगडे यांनी केली.

झोन दाखले व भाग नकाशा यासाठी नगरपरिषदेने ठरावान्वये निश्चित केलेले शुल्क कळविले. तसे अपीलकर्त्यास स्पष्ट केले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ रचना सहाय्यक, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, पुणे श्री.राहुल रामदास दिवेकर यांनी केले.

विशिष्ट कागदपत्रांसाठी पूर्व निर्धारित शुल्क आकारण्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार शासनाने मान्यता दिली आहे. अपीलकर्त्यास झोन दाखला / भाग नकाशासाठी असे निर्धारित शुल्क भरावे लागेल. सर्वसाधारण कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसाठी मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियमावलीत विहित केल्याप्रमाणे प्रति पृष्ठ रु. २/- प्रमाणेच शुल्क आकारणे आवश्यक आहे. नगरपरिषदेने ठरावाने त्याबाबत बदल करणे ग्राह्य नाही. त्यामुळे अशा प्रतीसाठी आकारलेल्या प्रतिपृष्ठ रु.२/- पेक्षा जास्त शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ रचना सहाय्यक, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, पुणे श्री.राहुल रामदास दिवेकर यांनी अपीलकर्त्यास परत करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्यावेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.
२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार अतिरिक्त शुल्क परत करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ रचना सहाय्यक, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, पुणे श्री.राहुल रामदास दिवेकर यांनी दि.३०.०६.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शाहिन शेख
१२३८ ब, गावभाग, सिध्दार्थ परिसर,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय आटपाडी,
जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अधिकारी,**
तहसील कार्यालय आटपाडी,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००२/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/०१/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २/०३/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आटपाडी तालुक्यातील महिला बचत गटांना दिलेल्या केरोसीन परवान्यासंदर्भात व केरोसीनच्या साठयाच्या अनुषंगाने एकूण ५ मुद्दयांची माहिती | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.५/०५/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री.शाहिन शेख हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्यास अभिलेखातील माहिती मुदतीत दिली तसेच आणखी माहिती हवी असल्यास कार्यालयात उपस्थित राहून अभिलेख पाहून आवश्यक कागदपत्रे घेऊनजाण्याबाबत लेखी कळविण्यात आले होते. तथापि अपीलकर्त्याने त्यानुसार माहिती प्राप्त करुन घेतली नसल्याचे,

तसेच अपीलकर्त्यास अजूनही काही माहिती आवश्यक असल्यास ती देण्यास तयार असल्याचे,' अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आटपाडी, जि.सांगली श्री.एस.बी.गोंजारी यांनी दि.५/०५/२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. केरोसीन परवानाधारकांच्या यादीत खाडाखोड, बचत गटांना केरोसीन पुरवठा कमी करणे याबाबतची अपीलकर्त्याची तक्रार माहिती अधिकार अधिनियम, २००५ अतंर्गत निर्णयाची नाही. मात्र त्या संदर्भातील सर्व माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. त्यानुसार आवश्यक तर अपीलकर्त्याने तहसीलदार कार्यालयात समक्ष उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 29 MAY 2010

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ. *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शाहीर किसन आवळे
राम मंदिर, मिशन कम्पाउंड,
सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय
घोले पथ, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
सांगली इंडस्ट्रीयल स्कूल, राम मंदिर, मिशन कम्पाउंड,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००८/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६/०२/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४/०३/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०/०३/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४/०३/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सांगली इंडस्ट्रीयल स्कूल या संस्थेमधील प्राचार्या व्यतिरिक्त अन्य सर्व कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्राच्या छायाप्रती, तांत्रिक शिक्षण प्रमाणपत्राच्या छायाप्रती, संस्थेकडे सर्व्हिसिंग स्टेशन आहे का याबाबतचा खुलासा व कर्मचाऱ्यांचा तपशील इ. ४ मुद्दे | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.५/०५/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अर्जदारास त्यांच्या माहिती-मागणी

अर्जाच्या अनुषंगाने मुदतीत माहिती देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सांगली इंडस्ट्रीयल स्कूल, श्री. संदीप राऊत यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. सांगली इंडस्ट्रीयल स्कूल, या संस्थेला कोणत्याही प्रकारे शासकीय अनुदान/ आर्थिक साहय मिळत नसल्याची बाब प्रचार्य, सांगली इंडस्ट्रीयल स्कूल, यांनी दि. १५/१०/२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविली आहे. सबब सदरचे अपील हे दखलयोग्य ठरत नाही. शाहीर आवळे व त्यांचे चार मित्र त्रास देण्यासाठी सातत्याने संस्थेकडे अर्ज करतात, वर्षभरात त्यांनी ३४ अर्ज केले आहेत, असे प्राचार्य, इंडस्ट्रीयल स्कूल, सांगली यांनी सदर पत्रात नमूद केले आहे. माहितीचा अधिकाराचा योग्य वापर करण्याची समज अपीलकर्ता श्री. आवळे यांना देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 24 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

ॲड.अमोल अजित चिमण्णा
प्लॉट नं.३५, राजमाने हौसिंग सोसायटी,
यशवंतनगर, सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सदस्य सचिव,**
प्रादेशिक निवड समिती व अधीक्षक अभियंता,
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मृद सर्वेक्षण अधिकारी,**
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय व
सचिव प्रादेशिक निवड समिती,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१५/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०/०२/२०१० |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पाटबंधारे विभागातील 'लिपीक' पदावरिल भरतीच्या अनुषंगाने आसन क्र.५१२१००३७८७ व ६१२०७०५६७० या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती | |

**विवेचन**

अपीलकर्ता ॲड. अमोल अजित चिमण्णा यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तरी देखील ॲड. चिमण्णा यांच्या अपिलाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा

मृद सर्वेक्षण अधिकारी, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला जन माहिती अधिकारी तथा मृद सर्वेक्षण अधिकारी, यांनी उमेदवारांना उत्तरपत्रिका पुरविण्यासाठी प्रादेशिक निवड समितीने निश्चित केल्यानुसार शुल्क आकारण्यात आले आहे. तसेच अपीलकर्त्याने नमूद केलेला आसन क्र. ६१२०७०५६७० हा यादीत शेवटी घालण्यात आला आहे, हे अपीलकर्त्याचे विधान सत्य नाही; असा खुलासा केला आहे.'सखोल चौकशी करुन न्याय मिळवून देण्याची' अपीलकर्त्याची अपिलातील मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अशोक नारायण कुलकर्णी
छत्रपती हाऊस, पौड रोड,
पुणे-३८

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,**
सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कर्मवीर भाऊराव पाटील चौक,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२२/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४/०८/२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३/०२/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री महाकाली सहकारी साखर कारखाना मर्यादित राजारामनगर, ता.कवठेमहांकाळ या कारखान्याने सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या संदर्भात एकूण १३ मुद्दे | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२९/०५/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. अशोक नारायण कुलकर्णी हे अनुपस्थित होते.

'अपीलकर्ता श्री. कुलकर्णी यांच्या माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने त्यांना मुदतीत उत्तर दिलेले आहे. तसेच त्यांनी अपिलीय प्राधिकाऱ्याकडे केलेल्या प्रथम अपिलामध्ये देखील त्यांना निर्णय दिलेला आहे,' असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली, श्री. व्ही .आर. चव्हाण यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्याच्या मूळ माहिती-मागणी अर्जातील बहुतांश मुद्दयांमध्ये भाष्य, खुलासा, कारणे व भविष्यकाळातील प्रस्तावित कार्यवाहीबाबत माहिती विचारलेली असून सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 29 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दिलीप सखाराम माने
एस.टी.स्टँड समोर, इस्लामपूर,
ता.वाळवा, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
वाळवा विभाग, इस्लामपूर, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२४/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/०२/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५/०३/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४/०३/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९/०४/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सर्वश्री. एस.बी.कदम, एस.एल.कारंडे व्ही.जी.माळी, एन.व्ही.वाठारकर, विठ्ठल पाटील, ए.आर.जंगम, एम.आर.देसाई, व्ही. वाय.भिसे, ए.एस.पवार, डी.एम.महाजन या तलाठयांच्या नियुक्तीचा दिनांक, संपत्तीचे विवरणपत्र, नियुक्ती वेळेचे व सध्याचे पगार पत्रक व रुपये २०००/- पेक्षा जास्त किंमतीच्या वस्तूंच्या खरेदीसाठी त्यांनी शासनाकडून घेतलेल्या परवानगी पत्राच्या छायाप्रती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२९/०५/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. दिलीप सखाराम माने

यांना त्यांच्या माहिती-मागणी अर्जानुसार मुदतीत उत्तर देण्यात आलेले आहे,' असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाळवा विभाग, जि.सांगली श्री.धनाजी पाटील यांनी प्रपत्रात पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे. तसेच अपीलकर्ता श्री. माने यांचा माहिती-मागणी अर्ज ज्या ज्या कार्यालयांशी संबंधित आहे, त्या त्या कार्यालयांकडे पाठविण्यात आला आहे. अपीलकर्त्याने संबंधित कार्यालयांशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी, असे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यांचे दि.९/०४/२००९ रोजीचे आदेश रास्त असून ते कायम करण्यात येत आहेत.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 29 MAY 2010

(सही)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संतोष ज्ञानेश्वर चिपडे
मु.पो.पिंपळगाव(धस), ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महावितरण कं. बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महावितरण कं. बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संतोष ज्ञानेश्वर चिपडे
मु.पो.पिंपळगाव(धस), ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महावितरण कं. बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.ए.एम.थोरात

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महावितरण कं. बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर
विद्यमान श्री.एस.के.दरबस्तवार तत्कालीन-श्री.एस.पी.राके

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.३.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१५.४.२०१० रोजी घेण्यात आली.

डीपीआर मध्ये ११ गावांचा समावेश झाला नाही. वारंवार मागणी करूनही त्याबाबत कार्यवाही झाली नाही, म्हणून त्या अनुषंगाने आपण माहिती मागितली. परंतु जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महावितरण कं.बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी अपुरी व चुकीची माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण कं.बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी आदेश देऊनही उपकार्यकारी अभियंता यांनी पूर्ण व सत्य माहिती दिली नाही. मूळ योजनेत ११ गावांचा समावेश न केल्यामुळे शेतकऱ्यांचे व वीज मंडळाचे न भरून येणारे नुकसान झाले आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संतोष ज्ञानेश्वर चिपडे यांनी केली.

चर्चेनुसार बार्शी विभागातील इतर उपविभागामधून प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण सात ट्रान्सफॉर्मर्स सदर वगळलेल्या गावात, स.स्थितीनुसार टेक्निकल फिजीबिलीटी असल्यास अंदाजपत्रके बनवून मंजूर करून सदरील टेंडर कालावधीत बसविण्यात येतील.'असे पत्र विभागीय माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (संवसु),विभाग, बार्शी, जि.सोलापूर श्री.एस.के.दरबस्तवार यांनी दि.२७.४.२०१० रोजी श्री.चिपडे यांना दिले,' असे या पत्रात नमूद केले आहे. या पत्रामुळे मूळ प्रकरणी आपली तक्रार राहिली नसून अपील निकाली काढावे, असे लेखी निवेदन श्री.चिपडे यांनी दिल्याचे, निवेदनाच्या प्रतीसह विभागीय माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (संवसु),विभाग, बार्शी, जि.सोलापूर श्री.एस.के.दरबस्तवार यांनी आयोगाला अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
21 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. आप्पासाहेब चाळू कांबळे
रा.कडाल, ता.गडहिंग्लज, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),**
पंचायत समिती गडहिंग्लज,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत मौजे कडाल,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२८/२०१०/कोल्हापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/०३/२०१० |
| ३ | अपिलासोबत माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. आप्पासाहेब चाळू कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती विद्या चंद्रकांत कांबळे
मु.पो.वांगी, ता.कडेगांव,
जि.सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
कडेगांव, जि.सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
कडेगांव, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४१/२०१०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५/१२/२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६/०२/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वांगी येथील फेरफार क्र.९८५६ ची नक्कल | |

**विवेचन**

अपीलकर्त्या श्रीमती विद्या चंद्रकांत कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 21 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सदाशिव मारुती सांगोलकर
मु.पो.आलेगांव, ता.सांगोला,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
श्री अशोकराव देसाई कृषी विद्यालय,
आलेगांव, ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४२/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/०४/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३/०५/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/०५/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) श्री अशोकराव देसाई कृषी विद्यालयातील किती शिक्षकांची बारा वर्ष सेवा पूर्ण झाली आहे, किती शिक्षकांचे सेवा अंर्तगत प्रशिक्षण झाले आहे व किती शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी दिली आहे इ. तपशील<br>२) बारा वर्ष सेवा पूर्ण झाल्यानंतर देखील कालबध्द वेतनश्रेणी न दिलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्त्यास केवळ शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांची माहिती देण्यात आलेली आहे. शिक्षकांबाबतची माहिती पंधरा दिवसांत देण्यात येईल', असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, श्री अशोकराव देसाई कृषी विद्यालय कु.मंदाकिनी भगवंत पाटील यांनी प्रपत्रात पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यानुसार दि.४/१२/२००८ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती पाठविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, श्री अशोकराव देसाई कृषी विद्यालय, यांनी दि.२३/१२/२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. त्यानुसार आपणास माहिती मिळाली किंवा कसे याबाबत अपीलकर्ता श्री.सांगोलकर यांना आयोगाच्या दि.८/०६/२००९ च्या पत्रान्वये विचारणा करण्यात आली. तथापि सदर पत्रास अपीलकर्ता श्री.सांगोलकर यांनी अद्याप कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व संबंधित पत्रव्यवहार विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुरज विजय खोपडे
मु.पो.आसले, ता.वाई,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक,**
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,
सदर बझार, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५७/२०१०/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/०२/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८/०२/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत 'शिपाई' पदावर अपंग उमेदवारांच्या केलेल्या नियुक्तीबाबतची माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. सुरज विजय खोपडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## **आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
दि :- 2 6 MAY 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अनिल गुलाबराव देशमुख
३७२/२ अ, समता पार्क,
शाहुपुरी, ता.व जि. सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था,
एस.टी.स्टँडजवळ, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था (३),
एस.टी.स्टँडजवळ, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५८/२०१०/सातारा |
| २ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२/०४/२०१० |
| ३ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. अनिल गुलाबराव देशमुख यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 21 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

अपीलकर्ता

श्री. अशोक सुरेश मोरे
मु.पो.सणसवाडी, ता.शिरुर,
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी,**
भारतीय स्टेट बँक,
कोरेगाव भिमा,
ता.शिरुर, जि.पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी,**
भारतीय स्टेट बँक,
कोरेगाव भिमा,
ता.शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६२/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/०२/२०१० |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६/०३/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** तक्रार रजिस्टर मध्ये नोंद केलेल्या तक्रारींच्या निवारणाबद्दल | |

<u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. अशोक सुरेश मोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे विरुध्द अपील केले आहे. सदरचे

प्राधिकरण हे केंद्रीय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेत येत असल्याने अपीलकर्ता श्री.मोरे यांनी आयोगाकडे केलेल्या या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 21 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दत्तात्रय भिमाजी खरात
फ्लॅट नं.५, गजानन अपार्टमेंट,
गल्ली नं.३, गजानन नगर, नवी सांगवी,
पुणे-२७

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
पुणे महानगरपालिका,
पुणे-५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता,**
बांधकाम नियंत्रण विभाग,
उप आयुक्त कार्यालय, क्र.४,
पुणे महानगरपालिका,
पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६६/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४/०७/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/०८/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/०९/२००९ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री रामदास साळवे यांनी कोंढवा बु.।। येथील स.नं.६४/१अ/१ मध्ये केलेल्या बांधकामाचा तपशिल | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय भिमाजी खरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत केले नसल्याने सदर अपील मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 2 1 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.